# ३. काळ (Tense)

महाराष्ट्री प्राकृत भाषेत वर्तमानकाळ, भूतकाळ आणि भविष्यकाळ हे तिन्ही काळ असले तरीही प्राकृतमध्ये वर्तमानकाळ आणि भविष्यकाळाचाच अधिक वापर होत असलेला दिसून येतो. भूतकाळ फार कमी प्रमाणात वापरला जातो. भूतकाळाऐवजी प्राधान्याने वर्तमानकाळाचाच उपयोग केला जातो.

## (१) वर्तमानकाळ (Present Tense)

१) महाराष्ट्री प्राकृत भाषेत मूळ क्रियांना काळाचे प्रत्यय जोडून क्रियापदाची विविध रूपे तयार केली जातात. त्यांना धातुसाधिते म्हणतात.

२) धातूंचे (१) अ, (२) आ, ए, ओकारांत असे दोन गट पाडण्यात आलेले दिसून येतात. धातूंच्या अन्त्य अक्षरामध्ये असणाऱ्या स्वरावरून धातूंचे हे गट पाडलेले दिसून येतात. उदा. –

भण (यातील अन्त्य 'ण' च्या उच्चारातून 'अ' स्वराचा उच्चार होतो म्हणून) हा धातू अकारान्त आहे

भण 'अ'कारान्त धातू आहे.

कर 'अ'कारान्त धातू आहे.

गा – (याच्या उच्चारात 'आ' हा स्वर आहे म्हणून) आकारान्त धातू

जा – आकारान्त धातू

दे – एकारान्त धातू

णे/ने – एकारान्त धातू

हो – ओकारान्त धातू

वरील धातूंना वर्तमान, भविष्यकाळाचे प्रत्यय जोडून क्रियापदाचे रूप तयार केले जाते.

**नियम :** अकारान्त धातूंना वर्तमानकाळाचे प्रथम पुरुषाचे प्रत्यय जोडतांना 'अकारान्ताचे आकारान्तामध्ये (अ=आ) रूपांतर करून नंतर प्रत्यय जोडले जातात. (मात्र इतर धातूंमध्ये असे होत नाही) उदा. पास = पासा= पासामि

### प्रत्यय

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | मि (आहे) | मो (आहेत) |
| द्‌वितीय पुरुष | सि (आहेस) | ह (आहात) |
| तृतीय पुरुष | इ (आहे) | अन्ति/न्ति (आहेत) |

### 'पास' (अकारान्त धातू) चालविणे

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | पासामि (मी पाहतो) | पासामो (आम्ही पाहतो) |
| द्‌वितीय पुरुष | पाससि (तू पाहतोस) | पासह (तुम्ही पाहता) |
| तृतीय पुरुष | पासइ (तो पाहतो) | पासन्ति (ते पाहतात) |

(**सूचना :** भण, सुण, खण, पढ, गच्छ, रम, इ. सर्व अकारान्त धातू वरीलप्रमाणे चालतात)

‘जा’ (आकारान्त धातू)

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | जामि | जामो |
| द्वितीय पुरुष | जासि | जाह |
| तृतीय पुरुष | जाइ | जायन्ति/जाअंति |

दे = एकारान्त धातू

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | देमि | देमो |
| द्वितीय पुरुष | देसि | देह |
| तृतीय पुरुष | देइ | देंति |

## (२) भविष्यकाळ (Future Tense)

**नियम :**

१) वर्तमानकाळाच्या प्रत्ययाच्या अगोदर ‘स्स’ चा वापर केला की भविष्यकाळाचे प्रत्यय तयार होतात. (उदा. स्सामि, स्सामो)

२) भविष्यकाळाचे प्रत्यय लावण्यापूर्वी अकारान्त धातूच्या शेवटच्या ‘अ’ चे इकारामध्ये रूपांतर केले जाते. (मात्र इतर धातूंना कोणताही बदल न करता प्रत्यय जोडले जातात.)

३) भविष्यकाळाचे प्रत्यय दोन प्रकारचे आहेत.

### i) पहिल्या गटाचे प्रत्यय :

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | स्सं, स्सामि | स्सामो |
| द्वितीय पुरुष | स्ससि | स्सह |
| तृतीय पुरुष | स्सइ | स्संति |

‘पास’ अकारान्त धातू चालविणे

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | पासिस्सं, पासिस्सामि | पासिस्सामो |
| द्वितीय पुरुष | पासिस्ससि | पासिस्सह |
| तृतीय पुरुष | पासिस्सइ | पासिस्संति |

(**सूचना :** कर, भण, खण, पढ, सुण, रम इ. धातू वरीलप्रमाणे चालतात.)

## ‘जा’ आकारान्त धातू चालविणे

| | | |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | जाइस्सं, जाइस्सामि | जाइस्सामो |
| द्विवितीय पुरुष | जाइस्ससि | जाइस्सह |
| तृतीय पुरुष | जाइस्सइ | जाइस्संति |

(**सूचना :** गा, खा या धातूंना वरीलप्रमाणे (कोणताही बदल न होता सरळ) प्रत्यय लावून भविष्यकाळाची रूपे तयार केली जातात.)

## ‘दे’ एकारान्त धातू चालविणे

| | | |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | देस्सं, देस्सामि | देस्सामो |
| द्विवितीय पुरुष | देस्ससि | देस्सह |
| तृतीय पुरुष | देस्सइ | देस्संति |

(**सूचना :** णे, घे, दे, हो या धातूंना वरीलप्रमाणे (कोणताही बदल न होता सरळ) प्रत्यय लावून भविष्यकाळाची रूपे तयार केली जातात.)

### ii) भविष्यकाळाचे दुसऱ्या गटाचे प्रत्यय :

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | हामि, हिमि | हामो, हिमो |
| द्विवितीय पुरुष | हिसि | हिह |
| तृतीय पुरुष | हिइ | हिन्ति/हिंति |

(**सूचना :** अकारान्त धातूचे इकारान्तामध्ये रूपांतर करून प्रत्यय जोडले जातात.)

## (३) भूतकाळ (Past Tense)

महाराष्ट्री प्राकृतमध्ये भूतकाळाचा उपयोग अत्यंत कमी प्रमाणात केला जातो. भूतकाळाऐवजी वर्तमानकाळाचाच वापर अधिक केलेला दिसून येतो.

### प्रत्यय

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | इत्था | इंसु |
| द्विवितीय पुरुष | इत्था | इंसु |
| तृतीय पुरुष | इत्था | इंसु |

उदा. – भासित्था, गच्छित्था, गच्छिंसु, भक्खिंसु

१) वरील प्रत्ययाशिवाय 'ईअ' हा प्रत्यय अकारान्त धातूला लावूनही भूतकाळाची रूपे तयार करतात.

| | |
|---|---|
| उदा. पुच्छ + ईअ = पुच्छीअ | पास = पासीअ |
| हण = हणीअ | खण = खणीअ |

२) अकारान्तेतर म्हणजे आ, ए, ओ, या धातूंना 'सी, ही, हीअ' इत्यादी प्रत्यय लावून भूतकाळी रूप तयार करतात.

उदा. जा = जासी, जाही, जाहीअ

खा = खासी, खाही, खाहीअ

दे = देसी, देही, देहीअ

हो = होसि, होही, होहीअ

३) भूतकाळाची अनियमित रूपे : आसि, आसी

उदा. वय = वआसि, वआसी

## (४) आज्ञार्थ (Imperative)

१) आज्ञा, हुकूम, विनंती करतेवेळी आज्ञार्थाचा उपयोग केला जातो.

२) आज्ञार्थाच्या प्रत्ययांत 'उकार' आढळतो.

३) फक्त अकारान्त धातूला 'मु, मो, हि' हे आज्ञार्थांचे प्रत्यय लावतेवेळी अकाराचे आकारान्तमध्ये रूपांतर करून नंतर प्रत्यय जोडले जातात.

४) द्‌वितीय पुरुषाच्या एकवचनामध्ये विकल्पाने प्रत्ययाचा लोप होतो.

### प्रत्यय

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | मु | मो |
| द्‌वितीय पुरुष | (प्रत्यय लोप), सु, हि | ह |
| तृतीय पुरुष | उ | न्तु |

### 'पास' अकारान्त धातू चालविणे

| | | |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | पासामु | पासामो |
| द्‌वितीय पुरुष | पास, पाससु, पासाहि | पासह |
| तृतीय पुरुष | पासउ | पासंतु |

(**सूचना :** कर, हस, भण, सुण, खण, रम इ. अकारान्त धातूंची रूपे वरीलप्रमाणे चालतात.)

### 'जा' आकारान्त धातू चालविणे

| | | |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | जामु | जामो |
| द्वितीय पुरुष | जा, जासु, जाहि | जाह |
| तृतीय पुरुष | जाउ | जायंतु |

## (५) ल्यबंत (पूर्वकालवाचक) (Gerund)

१) जेव्हा, करून, घेऊन, खाऊन, जाऊन, येऊन अशा क्रियापदाचा उपयोग करून दोन वाक्ये जोडली जातात तेव्हा ल्यबंताचा उपयोग केला जातो.

२) पुरुष, लिंग, वचन यांमुळे ल्यबन्तात कोणतेही बदल होत नाहीत.

३) फक्त अकारान्त धातूलाच 'इऊण' हा प्रत्यय लावून ल्यबंताचे रूप तयार केले जाते.

| | | |
|---|---|---|
| उदा. पास + इऊण = पासिऊण | कह = कहिऊण | धर = धरिऊण |
| भण = भणिऊण | सुण = सुणिऊण | गच्छ = गच्छिऊण |
| खण = खणिऊण | पढ = पढिऊण | रम = रमिऊण |

उदा. रामो आमं भक्खिऊण गेहं गच्छइ। राम आंबा खाऊन घरी जातो.

४) आकारान्त, एकारान्त, ओकारान्त धातूना 'ऊण' प्रत्यय जोडून ल्यबंताचे रूप तयार केले जाते.

जा + ऊण = जाऊण

| | | |
|---|---|---|
| गा = गाऊण | खा = खाऊण | दे = देऊण |
| घे = घेऊण | णे = णेऊण | हो = होऊण |

## (६) तुमंत (हेत्वर्थ) (Infinitive)

१) तुमंताचा उपयोग वाक्यात 'साठी, करिता' या अर्थाने केला जातो.

२) तुमंतामध्ये लिंग, वचन, विभक्ती यांनुसार बदल होत नाहीत.

३) अकारान्त धातूला 'इउं' हा प्रत्यय लावून तुमंताचे रूप तयार केले जाते.

| | | |
|---|---|---|
| उदा. पास + इउं = पासिउं, | भण = भणिउं | सुण = सुणिउं |
| कर = करिउं | पढ = पढिउं | खण = खणिउं |

उदा. राम आंबा खाण्यासाठी बागेत जातो.

रामो आमं भक्खिउं उज्जाणं गच्छइ।

४) आकारान्त, एकारान्त, ओकारान्त धातूंना 'उं' हा प्रत्यय लावून तुमंताचे रूप केले जाते.

| | | |
|---|---|---|
| जा = जाउं | गा = गाउं | खा = खाउं |
| दे = देउं | घे = घेउं | हो = होउं |